# शबनम न्युज

## दिवाळी विशेष अंक २०२१

किंमत ५.रु


## अष्टाक्षरी काव्य
## लक्ष्मीपूजन



आला दिवाळीचा सण
हर्ष उत्साह घेऊन
तेजोमय आसमंत
तृप्त सृष्टीस पाहून..

रांगोळीचे रंग छान
सजे अंगणी सजून
वात पणती संगती
देई प्रकाश प्रेमान ...

रास दिव्यांची अंगणी
चहूकडे नवरंग
मनी उत्कर्ष ठेवुनी
उजळवू अंतरंग...

नरकचतुर्दशीला
स्नान पहाटे अभ्यंग
तेल सुगंधी उटणे
साजे एकमेका संग....

झेंडू फुले नी आंब्याची
दारी तोरनी लावली
दीपमाळा रोषणाई
सप्तरंगी ती सजली....

सायंकाळी लक्ष्मीपूजा
सारे मिळुनी करती
धन धान्य जगी लाभो
करी मातेस विनंती....

सौ.राजश्री मराठे (हैदराबाद)










# साद सोशल फाऊंडेशनच्या वतीने अंध बांधवांना दिवाळी फराळ वाटप.

## आज माझ्या अंध बांधवाच्या चेह–यावरील आनंदात माझी दिवाळी उजळून निघाली..कामगार नेते इरफान सय्यद.

**• शबनम न्यूज मिडीया ग्रुप**



पिंपरी : तिमिरातून तेजाकडे जाण्याचा प्रकाशाचा उत्सव म्हणजे दिवाळी देशभरात हा सण आनंदाने साजरा केला जातो. अंध कुटुंबियांच्या सोबत दिवाळी साजरी करण्याचा अनोखा उपक्रम साद सोशल फाउंडेशन यांच्या वतीने आकुर्डी येथे घेण्यात आला. पिंपरी चिंचवड पोलिस उपायुक्त श्री.मंचक इप्पर सर यांच्या उपस्थितीत सदर कार्यक्रम पार पडला. सर्व सामान्यांचे दु:ख जाणून घेऊन त्याला शक्य होईल ती मदत करणे हीच खरी ईश्वराची सेवा आहे. " दिव्यांगाचे आशिर्वाद हीच आमची उर्जा " ह्याच आशिर्वादाच्या जोरावर गेल्या ७ वर्षांपासून हा सामाजिक उपक्रम अखंड चालु आहे. मोहननगर येथे ५ ते १० लोकांच्या पासुन चालु केलेला हा सामाजिक उपक्रमात आज अनेक दिव्यांग बांधव आनंदाने सहभागी होऊन त्यांच्या सोबत दिवाळी साजरी करण्याची संधी आम्हाला देतात. आज माझ्या अंध बांधवाच्या चेह-यावरील आनंदात माझी दिवाळी उजळून निघाली, असे मत साद सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष इरफान सय्यद यांनी आकुर्डी येथे व्यक्त केले. दिवाळी हा दिव्यांचा उत्सव हा उत्सव सर्वजण मोठ्या उत्साहात साजरा करतात. समाजातील अंध बांधवांच्या जीवनात ही दिवाळी असाच प्रकाश घेऊन यावी, यासाठीच साद सोशल फाऊंडेशनच्या माध्यमातून अंध कुटुंबियांना दिवाळी फराळ वाटप करण्यात आला हा उपक्रम खरच खूप छान आहे. जेव्हा आपण समाजातील शेवटच्या घटकांचा विचार करून काम करतो त्यात आपण नेहमीच यशस्वी होतो आणि अशा घटकाचे विचार करणारे नेतृत्व इरफान सय्यद यांच्या रूपाने निर्माण होत आहे. समाजातील हा अंध बांधव ह्याच्या मध्ये एक खुप मोठी शक्ती असते त्याचा वापर केला तर ते या जीवनात खूप मोठ्या पदावर जाऊ शकतात किंवा यशस्वी होऊ शकतात. आजही माझ्या सारख्या प्रशासकीय सेवेत काम करणारे अनेक अधिकारी आहेत त्याच्या सोबत अंध बांधव दीव्यांग बांधव सुध्दा आहेत. आपण ही अशाच प्रकारे आपल्यातील कलागुणांना प्रोत्साहन देऊन खूप यशस्वी पणे आयुष्य जगावे ही सदिच्छा त्यांनी व्यक्त करून दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी MPC news चे संपादक श्री.अनिलजी कातले , उद्योजक श्री.राजेश पंगल , सूर्या इलेक्ट्रोनिकचे रमेश चौधरी , डॉ. श्याम अहिरराव , डॉ.महेश शेटे , प्रशांत थोरवे, अतिश बारणे , शिवाशेठ बहिरट , लतीफभाई खान, रवी घोडेकर , दस्तगीर मणियार, परेश मोरे, हाजी लालू भाई, पत्रकार संजय जगदाले,शबनम सय्यद,भुषण नंदुरकर, अमोल काकडे, प्रशांत सालुंखे, विकास शिंदे, प्रभाकर गुरव,संजय बांदल प्रवीण जाधव, अनिल दळवी सर्जेराव कचरे, पांडुरंग कदम,संतोष जाधव, किशोर जैद, व सहकारी उपस्थित होते.

आकुर्डी येथील श्री खंडोबा सांस्कृतिक भवन येथे दिवाळी फराळ वाटप कार्यक्रम आयोजित केला होता. दिवाळी फराळ वाटपाच्या कार्यक्रमात एक हजार अंध कुटुंबियांना दिवाळी फराळाचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री.भाऊसाहेब कोकाटे यांनी केले व सर्जेराव कचरे यांनी आभार मानले. श्री.नागेश व्हनवटे , उज्वला गर्जे , अरुण जोगदंड , प्रितेश शिंदे, चंदन वाघमारे , श्रीकांत सुतार , धीरज चव्हाण , समर्थ नायकवडे यांनी कार्यक्रम यशस्वितेसाठी प्रयत्न केले.

> “साद सोशल फांडेशनच्या वतीने गेली ७ वर्षांपासून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. अंध कुटुंबियांना दिवाळी फराळ वाटप हे सामाजिक बांधिलकी म्हणून काम करत असताना सर्वात जास्त समाधान होत असल्याचे सांगून समाजातील विविध स्तरातील गरजूंना केलेली मदत हे ख-या अर्थाने समाजऋण फेडण्याचे काम आहे, असेही सय्यद यांनी सांगितले. मागील ७ वर्षांपासून हा कार्यक्रम आम्ही अंध बांधवांच्या आशीर्वादाने व सहकारी मित्र यांच्या सहकार्याने राबवत आहोत. ह्या बांधवांनी दिलेले आशिर्वाद हीच माझी उर्जा आहे. ज्या उर्जेमुळेच मला सामाजिक कार्याची प्रेरणा मिळते. अंध कुटुंबियांच्या चेह-यावरील पाहिलेला आनंद हा चिरकाल राहण्यासाठी साद सोशल फाउंडेशनचे सर्व सहकारी सतत प्रयत्नशील राहतील,अशी ग्वाही श्री इरफान सय्यद यांनी दिली.”

# स्मार्ट सिटीतील भ्रष्टाचाराची 'ईडी'मार्फत चौकशी होणार; शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांची माहिती



• शबनम न्यूज मिडीया ग्रुप

पिंपरी-चिंचवड स्मार्ट सिटी योजनेत मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार चालला आहे. ठेकेदारांना पोसण्यासाठी कामे काढली आहेत. योजनेचा नागरिकांना कमी आणि ठेकेदारांनाच जास्त लाभ मिळत आहे. बाजारभावापेक्षा अधिकच्या किमती दाखवून वस्तु, साहित्याची खरेदी केली आहे. या भ्रष्टाचारात स्मार्ट सिटी कंपनीचे संचालक सामील आहेत. त्यामुळे स्मार्ट सिटीतील भ्रष्टाचाराची निष्पक्षपातीपणे सखोल चौकशी करण्याची मागणी शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी ईडीच्या संचालकांकडे केली.

शिवसेना खासदार बारणे यांनी अंमलबजावणी संचालनालयाचे (ईडी) संचालक संजय कुमार मिश्रा यांची आज (मंगळवारी) दिल्लीतील कार्यालयात भेट घेतली. पिंपरी-चिंचवड स्मार्ट सिटीतील भ्रष्टाचाराची सविस्तर माहिती दिली. त्याबाबतची सर्व कागदपत्रे त्यांच्याकडे सुपूर्द केली आहेत. त्यावर 'आणखी काही कागदपत्रे असतील तर, ती द्यावीत याची चौकशी लावतो' असे आश्वासन ईडीचे संचालक मिश्रा यांनी दिल्याचे खासदार बारणे यांनी सांगितले. त्यामुळे स्मार्ट सिटीतील भ्रष्टाचाराची आता ईडीमार्फत चौकशी होणार आहे.

याबाबतची माहिती देताना खासदार बारणे म्हणाले, पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या स्मार्ट सिटीतील भ्रष्टाचाराची चौकशी करण्याची मागणी ईडीकडे केली आहे. स्मार्ट सिटी योजनेत मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार चालला आहे. स्मार्ट सिटीतील भ्रष्टाचाराबाबत मी 18 मार्च 2020 रोजी केंद्रीय शहरी विकास मंत्री हरदीप सिंह पुरी यांना पत्र दिले होते. त्याचबरोबर

लोकसभेत 13 फेब्रुवारी 2021 रोजी स्मार्ट सिटीतील भ्रष्टाचाराचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यावर शहरी विकास मंत्रालयाने स्मार्ट सिटीकडे माहिती मागवली. पण, स्मार्ट सिटीने गोलमाल उत्तरे दिली

# इन्क्युबेशन व इनोव्हेशन आणि विज्ञान संशोधन केंद्राचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते उद्घाटन



• शबनम न्यूज मिडीया ग्रुप

बारामती : इन्क्युबेशन व इनोव्हेशन आणि विज्ञान संशोधन केंद्राचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी ज्येष्ठ नेते खासदार शरद पवार, विधान परिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, उपमुख्यमंत्री अजित पवार, सौ. रश्मीताई ठाकरे, राज्यमंत्री दत्तात्रय भरणे, खासदार सुप्रिया सुळे, आमदार रोहित पवार, उद्योजक बाबा कल्याणी, विजय शिर्के, दिपक छाब्रिया, प्रतापराव पवार, ट्रस्टचे चेअरमन राजेंद्र पवार आदी उपस्थित होते. ॲग्रिकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टतर्फे बाल वैज्ञानिक घडविण्यासाठी सायन्स अँड इनोव्हेशन ॲक्टिव्हिटी सेंटर उभारण्यात आले आहे. विविध राज्यस्तरीय वैज्ञानिक आणि शैक्षणिक संस्थामध्ये शालेय विद्यार्थ्यांना नेऊन त्यांची विज्ञानाबद्दल जिज्ञासा वाढविणे, योग्य शैक्षणिक दिशा देणे, विज्ञान सोपे आणि सहज करुन शिकवता येईल अशा प्रयोगासाठी उपयुक्त कीट विविध शाळांमध्ये वाटप आणि शिक्षकांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. याच विद्यार्थ्यांना नावीन्यपूर्ण संकल्पना सोबतच व्यासपीठ, संशोधनाकडे वळविणे यासाठी या केंद्रांच्या माध्यमातून काम होणार आहे. मुलांमध्ये कौशल्य विकसन व्हावे या दृष्टीने आभासी माहिती तंत्रज्ञान, रोबोटिक्स तंत्राचा प्रत्यक्ष निरीक्षणातून अनुभव घेण्याची सुविधा या केंद्रामध्ये उपलब्ध आहे. विद्यार्थी आणि नागरिकांमध्ये देखील विज्ञानाची आवड निर्माण होण्यासाठी हे सेंटर उपयुक्त ठरणार आहे.














# स्त्रियांचे सोळा श्रृंगार कोणते ते जाणून घेऊ या...!



● केसांमध्ये गजरा / फुले - केसांना स्त्रियांचे दागिने म्हटले जाते, केसांना गजरा आणि फुलांनी सजवणे, त्यांच्या सुगंधाचा मनाच्या आरोग्यावर चांगला परिणाम होतो आणि सुगंधाने मन प्रसन्न आणि आनंदी राहते. ● बिंदी - कपाळावर बिंदी लावल्याने व्यक्तिमत्व प्रभावी होते. डोक्याच्या मध्यभागी बिंदी लावल्याने तिसरा डोळा जागृत होतो. बिंदी लावण्याने मनोवैज्ञानिक परिणाम होतो आणि त्यामुळे महिलांचा आत्मविश्वास अधिक वाढतो. त्याच वेळी, मन देखील शांत राहते. ● सिंदूर - शरीरशास्त्रानुसार, ज्या ठिकाणी सिंदूर सजवला जातो तो ब्रह्मरंध्र आणि अहिम नावाचा मर्मस्थळाच्या अगदी वर असतं, जे खूप मऊ असतं. येथे सिंदूर लावल्याने या ठिकाणाचे रक्षण होते. याशिवाय सिंदूरमध्ये असे काही घटक असतात जे चेहऱ्यावरील सुरकुत्याचा प्रभाव कमी करतात आणि स्त्रियांच्या शरीरातील विद्युत उत्तेजनावर नियंत्रण ठेवतात.

● हार किंवा मंगळसूत्र - मंगळसूत्र आणि त्याच्या मण्यांमधून बाहेर येणारं वारं महिलांची रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करते. आयुर्वेदानुसार गळ्यात सोनेरी धातू घातल्याने छाती आणि हृदय निरोगी राहते. याशिवाय त्यात असलेले काळे मोती स्त्रियांचे वाईट नजरेपासून रक्षण करतात. ● कानातले आणि झुमके - कान टोचल्याने दृष्टी सुधारते. खरं तर, कानाच्या खालच्या भागात एक बिंदू असतो ज्याद्वारे डोळ्यांच्या नसा जातात. कानाच्या या बिंदूला छेदताना आणि त्यात कानातले घातल्यावर दृष्टी वाढण्यास मदत होते. ● मांग टिका - डोक्याच्या मध्यभागी घातलेला मांग टिका, स्त्रियांचे सौंदर्य वाढवण्याव्यतिरिक्त, मेंदूशी संबंधित कार्ये संतुलित आणि नियमित ठेवते. ● बांगड्या आणि ब्रेसलेट - जेव्हा स्त्रियांच्या बांगड्या हातांच्या मनगटावर आदळतात तेव्हा ते शरीरातील रक्तप्रवाह सुधारते. यासह, ते स्त्रियांच्या शरीरात हार्मोन्स संतुलित ठेवण्यास मदत करतात. ● बाजूबंद - बाजूबंद बाहूमध्ये धारण केल्याने हातावर असलेल्या केंद्रांवर दबाव येतो, ज्यामुळे स्त्रिया दीर्घकाळ सुंदर आणि तरुण राहतात. ● कमरबंद - हे परिधान केल्याने स्त्रियांमध्ये हर्नियाचा धोका कमी होतो. ● पैंजण - पैंजण शरीरातील पायांमधून बाहेर पडणारी भौतिक विद्युत ऊर्जा जपते. स्त्रियांच्या उदर आणि खालच्या अंगात चरबी वाढण्यास प्रतिबंध करते. यासोबतच, चांदीच्या पैंजणचे पायात घर्षण होत असल्याने पायांची हाडे मजबूत होतात. ● जोडवी- जोडवी एक्यूप्रेशर उपचार पद्धतीवर कार्य करते, ज्यामुळे मज्जासंस्था आणि शरीराच्या खालच्या भागांचे स्नायू मजबूत राहतात. हे एका विशिष्ट शिरावर दबाव टाकते जे गर्भाशयात योग्य रक्त परिसंचरण करते, जे चांगले गर्भधारणा करण्यास मदत करते. ● नथ - नथ घातलेल्या ठिकाणी एक प्रकारचा एक्यूप्रेशर पॉइंट असतो, ज्यामुळे प्रसूतीच्या वेदना दरम्यान वेदना कमी होते. ● अंगठी - बोटांमध्ये अंगठी घातल्याने आळस आणि सुस्ती कमी होते. ● मेंदी - मेहंदी तळवे सुशोभित करते तसेच शरीर थंड ठेवते आणि त्वचा रोग बरे करण्यास मदत करते.

● काजळ - काजल लावल्याने डोळे थंड होतात आणि डोळ्यांशी संबंधित अनेक समस्या दूर होतात. ● लाल किंवा हिरव्या रंगाचे कपडे - सणासुदी गडद रंगाचे कपडे परिधान केल्याने सौंदर्य वेगळंच उठून दिसतं.

साप्ताहिक शबनम न्यूज बातमीपत्र मालक मुद्रक प्रकाशक सय्यद रफिक हुसेन व संपादिका शबनम सय्यद यांनी सनशाईन ग्राफिक्स डिझाईन प्रिंटिंग प्रेस येथे छापून 16 नंबर बस स्टॉप जवळ थेरगाव पिंपरी चिंचवड पुणे-33 येथून प्रकाशित केले आहे सदर बातमी मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही (न्याय कक्षा पुणे न्यायालय) अधिक माहितीसाठी संपर्क 9075624359 / 7218327321
Email - shabnamnews2015@gmail.com Website - www. Shabnamnews.In